आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१६ ऑक्टोबर २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आंध्र प्रदेशात १३ हजार ४३० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी
- देशातल्या सर्व गुन्हेगारांना कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी यंत्रणा विकसित करणं सुरू असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
- खासगी क्षेत्रात आरक्षण लागू करण्याच्या मागणीचा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्याकडून पुनरुच्चार
- देशातल्या शेअर बाजारात सलग दुसऱ्या दिवशी जोरदार तेजी, सेन्सेक्समधे ८६२ अंकांची वाढ

**आणि**

- नैऋत्य मौसमी पावसाची संपूर्ण देशभरातून माघार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आंध्रप्रदेशातल्या कुरनूल इथं १३ हजार ४३० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. उद्योग, ऊर्जा, रस्ते, रेल्वे, संरक्षण उत्पादन तसंच पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू क्षेत्रातील हे प्रकल्प आहेत.

देशातल्या प्रत्येक गावात वीज पोहोचली असून वीज वापर १४०० युनिटनं वाढल्याचं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. ऊर्जा क्षेत्रात भारत नवे मापदंड तयार करत आहे, असंही प्रधानमंत्री म्हणाले. यावेळी त्यांनी विशाखापट्टणम इथं उभारल्या जाणाऱ्या एआाय हबचाही उल्लेख केला. आंध्रप्रदेशाचे मुख्यमंत्री चंद्राबाबु नायडू आणि उपमुख्यमंत्री पवन कल्याण उपस्थित होते.

त्याआधी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी श्रीशैलम इथं श्री शिवाजी स्फुर्ती केंद्रम इथं छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ध्यानस्थ मूर्तीला अभिवादन केलं.

**<><><><><>**

भ्रष्टाचार, गुन्हेगारी आणि दहशतवादाच्या विरोधात सरकारनं शून्य सहिष्णुता धोरण स्वीकारलं आहे, असा पुनरुच्चार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केला आहे. नवी दिल्लीत ते आज प्रत्यार्पण आव्हाने आणि रणनीती संबंधीच्या परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर बोलत होते. सर्व गुन्हेगारांना कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी एक मजबूत यंत्रणा विकसित केली जात असल्याचं ते म्हणाले. या परिषदेविषयी शहा म्हणाले....

**होल्ड.. बाईट-अमित शहा**

सीबीआयनं ही दोन दिवसांची परिषद आयोजित केली आहे.

या परिषदेत विविध केंद्रीय आणि राज्य पोलीस संस्थांचे वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि आंतरराष्ट्रीय पोलीस सहकार्याच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी सहभागी होत आहेत.

**<><><><><>**

एकेकाळी नक्षलवाद्यांचा गड समजला जाणारा अबूझमाड आणि बस्तरच्या उत्तरेकडचा भाग नक्षल हिंसाचारमुक्त झाल्याची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली. बस्तरच्या दक्षिण भागात किरकोळ हिंसाचार सुरू असून तो भागही लवकरच नक्षलमुक्त होईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशात संरक्षण उत्पादन निर्मितीसाठी सरकारनं केलेल्या प्रयत्नांचं फळ ऑपरेशन सिंदूरच्या रुपातून भारताला मिळाल्याचे गौरवोद्गार संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काढले आहेत. पुण्यात सिम्बॉयसिस स्किल अँड प्रोफेशनल विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. गेल्या १० वर्षात संरक्षण उत्पादन ४६ हजार कोटींवरुन दीड लाख कोटींच्या वर गेलं आहे. त्यात खासगी क्षेत्राचं योगदान ३३ हजार कोटी रुपयांचं आहे, असं ते म्हणाले. २०२९ पर्यंत देशांतर्गत संरक्षण उत्पादन ५० हजार कोटी रुपयांच्या वर जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

खासगी क्षेत्रातही आरक्षण लागू करायला हवं असं मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज पुन्हा व्यक्त केलं. ते नागपुरात वार्ताहर परिषदेत बोलत होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत विचारलं असात महाविकास आघाडीमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला घेऊन मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीत फारसा फायदा होणार नाही असं आठवले म्हणाले.

मुंबईत ४० टक्के मराठी मतदारांचा कौल हा महायुतीला मिळणार असून २० टक्के मतं राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांना मिळू शकतील असा अंदाज त्यांनी व्यक्त केला. येत्या ८ मार्चला आरपीआयचं राष्ट्रीय अधिवेशन नागपुरात होणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

चंद्रपूर इथं धम्मदीक्षा अनुप्रवर्तन दिनाच्या कार्यक्रमातही आठवले सहभागी झाले. नेते एकत्र आले तरी जनता एकत्र येत नाही हीच रिपब्लिकन ऐक्यातली सर्वात मोठी समस्या असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

गुजरातमध्ये मंत्रिमंडळाचा उद्या विस्तार होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल वगळता इतर सर्व मंत्र्यांनी राजीनामे दिले आहेत. नव्या मंत्र्यांचा शपथविधी उद्या होणार आहे. राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या उपस्थितीत गांधीनगर इथे हा शपथविधी होईल. राज्य मंत्रिमंडळाच्या विस्तारात समाविष्ट झालेल्या मंत्र्यांना राज्यपाल पद आणि गोपनीयतेची शपथ देतील.

**<><><><><>**

अमेरिकन फेडरल रिझर्व्हकडून दर कपातीची अपेक्षा, जागतिक बाजारातलं सकारात्मक वातावरण यामुळं सलग दुसऱ्या दिवशी देशातल्या शेअर बाजारात जोरदार तेजी होती. सकाळपासून असलेली तेजी दुपारपर्यंत आणखी वाढत गेली. दिवसअखेर सेन्सेक्स ८६२ अंकांची वाढ नोंदवून ८३ हजार ४६८ अंकांवर बंद झाला. निफ्टी सुमारे २६२ अंकांनी वधारुन २५ हजार ५८५ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

संपूर्ण देशातून नैऋत्य मौसमी पावसाचा परतीचा प्रवास आज पूर्ण झाला. भारतीय हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार तामिळनाडू, पुद्दुचेरी, आंध्र प्रदेशची किनारपट्टी, रायलसीमा, दक्षिण कर्नाटक आणि केरळ-माहे या भागांत ईशान्य मान्सून पावसाळ्याची सुरुवात झाली आहे. या प्रदेशात उद्या मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. तसंच पुढील सात दिवसांत या ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या विविध जिल्ह्यांमधल्या हवामानात बदल झाल्याचं दिसून येत असल्याचं युनिसेफ इंडियाचे हवामान तज्ज्ञ युसूफ कबीर यांनी आज सांगितलं. पत्र सूचना कार्यालय, मुंबई आणि युनिसेफ, इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान बदल आणि पर्यावरणीय शाश्वता या विषयावर मुंबईत आयोजित परिसंवादात ते बोलत होते.

सातारा जिल्ह्याच्या काही भागात कमी पाऊस पडायचा, आता तिथं मुसळधार पाऊस होत असल्याकडे, कबीर यांनी लक्ष वेधलं. हवामानातल्या या बदलांचा अभ्यास केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी करण्याची गरज असून त्यादृष्टीनं एकत्रितपणं पावलं उचलावीत असं त्यांनी सांगितलं.

एकल प्लॅस्टिकचा वापर टाळणं, अतिरीक्त विजेचा वापर टाळणं, पाण्याचा जपून वापर करणं अशा लहान लहान कृतींमधून पर्यावरणाची काळजी सर्वांनी घ्यायला हवी, असं आवाहन पीआयबीच्या पश्चिम विभागाच्या महासंचालक स्मिता वत्स शर्मा यांनी यावेळी केलं.

<><><><><>

संयुक्त राष्ट्रांची आशिया-प्रशांत विभागीय भू-स्थानिक माहिती व्यवस्थापन समितीच्या सहअध्यक्षपदी भारताची निवड झाली आहे. ही निवड २४ ते २६ सप्टेंबर या कालावधीत कोरिया इथं झालेल्या १४ व्या अधिवेशन बैठकीत झाली असून, ती तीन वर्षांसाठी आहे.

भारताची ही निवड जागतिक भू-स्थानिक क्षेत्रातील देशाचं वाढतं नेतृत्व आणि नवोन्मेष, क्षमता-विकास आणि प्रादेशिक सहकार्य वाढवण्यात भारतानं दिलेल्या योगदानाची दखल घेणारी असल्याचं, विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

आयसीसी महिला एकदिवसीय क्रिकेट विश्व चषक स्पर्धेत आज विशाखापट्टणम इथं सुरु असलेल्या सामन्यात बांगलादेशानं ऑस्ट्रेलियापुढं विजयासाठी १९९ धावांच आव्हान ठेवलं आहे. बांगलादेशानं नाणेफेक जिंकून, प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. आणि निर्धारित ५० षटकात ९ गडी गमावून १९८ धावा केल्या.

या धावसंख्येचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हेली आणि फोएबे लिचफिल्ड यांनी फटकेबाजी करत अर्धशतकं पूर्ण केली. शेवटची बातमी हाती आली तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या २१ षटकात बिनबाद १५५ धावा झाल्या होत्या.

या स्पर्धेत भारताचा पुढचा सामना येत्या रविवारी इंग्लंडबरोबर होणार आहे.